

पालकांनी आपल्या मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज -प्रा. विठ्ठल कांगणे

सविस्तर वृत्त पान ३ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-37 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 18 मे 2026 ■ किंमत 2 रुपये, पाने -4

## जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल-मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही ‘मेडिकल केअर सिस्टम’ मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता ‘स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र’ हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

## सीईओ बंगल्याच्या दुरुस्ती प्रकरणात गैरव्यवहाराचा आरोप; चौकशीची मागणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा परिषद उपकर निधीतून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती व विद्युतीकरणासाठी मंजूर करण्यात आलेल्या २५ लाख रुपयांच्या कामात गंभीर गैरव्यवहार झाल्याचा आरोप जिल्हा परिषद सदस्या सविता संतोष जाधव यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. जिल्हा परिषद उपकर निधीतून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरुस्ती व विद्युतीकरणासाठी एकूण २५ लाख रुपयांची तरतूद यानंतर ६ नोव्हेंबर २०२५ रोजी दुरुस्ती कामासाठी ‘रोहन कन्स्ट्रक्शन’ या संस्थेच्या नावे १५ लाख ८३ हजार २२६ रुपयांचे बिल अदा करण्यात आले. तसेच विद्युतीकरणाच्या कामासाठी ‘रॉयल इलेक्ट्रिकल्स’ला ६ लाख ३५ हजार ५६२ रुपयांचे काम देण्यात येऊन त्याचेही देयक मंजूर करण्यात आल्याचे जाधव यांनी नमूद केले.

मात्र, २ एप्रिल २०२६ रोजी नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी रुजू झाल्यानंतर संबंधित निवासस्थानी कोणतेही प्रत्यक्ष काम झाले नसल्याचे समोर आल्याचा दावा त्यांनी केला आहे. प्रत्यक्ष काम न करताच लाखो रुपयांचा अपहार करण्यात आल्याचा आरोप करत जाधव यांनी या प्रकाराला कुंपणानेच शेत खाल्ल्याचा प्रकार असे संबोधले आहे.

या संपूर्ण प्रकरणात बांधकाम विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोप करत दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा शांततेत आणि शिस्तबद्ध पार पडली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) पोलीस शिपाई भरतीची लेखी परीक्षा रविवारी सकाळी शहरातील चार केंद्रांवर शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. सकाळी ११ ते १२.३० या वेळेत घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी तब्बल ८ हजार ५०० उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यामुळे सकाळपासूनच परीक्षा केंद्र परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळाली. कडक तपासणी करूनच केंद्रात प्रवेश देण्यात आला. पण परीक्षा केंद्रांवर उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे त्यांना आपल्या बॅगा परीक्षा केंद्राबाहेर उघड्यावर ठेवाव्या लागल्या काही बॅगा झाडांवर अडकवलेल्याही दिसून आल्या.

एमआयटी कॉलेज, श्रेयस कॉलेज, चाटे स्कूल आणि एंजल कीड स्कूल या चार केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी पोलीस विभाग आणि प्रशासनाच्या वतीने विशेष नियोजन करण्यात आले होते. केंद्र परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उमेदवारांना प्रवेश देण्यापूर्वी कडक तपासणी करण्यात आली. परीक्षेसाठी उमेदवार सकाळी लवकरच केंद्रावर दाखल झाले. केंद्रांबाहेर पालक आणि नातेवाईकांचीही मोठी उपस्थिती दिसून आली.

परीक्षा प्रक्रियेत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली. परीक्षेच्या कामकाजासाठी एकूण एक हजार कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. पोलीस विभागाच्या नियमानुसार संपूर्ण परीक्षाप्रक्रिया सुरळीत पार पडली. परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. पण उमेदवारांनी आणलेले साहित्य ठेवण्याची कोणतीही तजवीज नव्हती. अनेक उमेदवार बाहेर गावांवरून आले होते. त्यामुळे त्यांच्यापुढे आपल्यासोबतच्या बॅगा कुठे ठेवायच्या हा प्रश्न होता.

## यूपीआय पेमेंटचा आग्रह; ग्राहकाला बूटही नाही, पैसेही नाहीत

### बाटा इंडिया व ब्लू डार्टला ग्राहक आयोगाचा दणका; रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कॅश ऑन डिलिव्हरीने ऑनलाइन बूट मागविल्यानंतर डिलिव्हरीवेळी रोख रक्कम न स्वीकारता यूपीआय पेमेंटचा आग्रह धरणे आणि पैसे कंपनीच्या खात्यात जमा होऊनही ग्राहकाला वस्तूची डिलिव्हरी न देणे, हे बाटा इंडिया लिमिटेड व ब्लू डार्ट एक्सप्रेस लिमिटेड या कंपन्यांना चांगलेच महागात पडले आहे. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दोन्ही कंपन्यांना ग्राहकाला ३ हजार ९९९ रुपये ८ टक्के व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत.

म्हसोबा नगर परिसरातील ॲड. करण लक्ष्मण तुपे यांनी याप्रकरणी ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. त्यांनी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बाटा इंडिया लिमिटेडच्या संकेतस्थळावरून हश पपीज कंपनीचे फॉर्मल शूज मागविले होते. या बुटांची किंमत ३ हजार ९९९ रुपये होती. पेमेंट मोड ‘कॅश ऑन डिलिव्हरी’ ठेवण्यात आला होता.

४ मार्च रोजी ब्लू डार्टचा डिलिव्हरी कर्मचारी पार्सल घेऊन घरी पोहोचला. मात्र, त्याने रोख रक्कम स्वीकारण्यास नकार देत यूपीआयद्वारे पेमेंट करण्याचा आग्रह धरला. त्यावेळी तुपे यांच्या वडिलांनी क्यूआर कोड स्कॅन केला. मात्र, चुकून डिलिव्हरी एजंटऐवजी पार्सलवरील बाटा कंपनीचा क्यूआर कोड स्कॅन झाल्याने ३ हजार ९९९ रुपये थेट कंपनीच्या खात्यात जमा झाले. पेमेंट झाल्यानंतरही रक्कम लॉजिस्टिक कंपनीला मिळाली नसल्याचे सांगत डिलिव्हरी कर्मचाऱ्याने पार्सल देण्यास नकार दिला. त्यानंतर तुपे यांनी बाटा कंपनीकडे वारंवार तक्रारी व ई-मेलद्वारे पाठपुरावा केला. मात्र, ना पैसे परत मिळाले ना बुटांची डिलिव्हरी झाली.

सुनावणीदरम्यान आयोगाने कॅश ऑन डिलिव्हरीची अट असताना यूपीआय पेमेंटचा आग्रह धरणे ही सेवेतील त्रुटी असल्याचे नमूद केले. तसेच ग्राहकाला योग्य मार्गदर्शन न केल्यामुळेच हा गोंधळ झाल्याचे निरीक्षण आयोगाने नोंदवले. बाटा कंपनीने संपूर्ण रक्कम मिळूनही ग्राहकाचा प्रश्न सोडवला नसल्याने दोन्ही कंपन्यांना संयुक्तपणे जबाबदार धरले.

आयोगाचे अध्यक्ष सादिक अली बी. सय्यद, सदस्या जान्हवी ए. भिडे आणि सदस्य गणेशकुमार आर. सेलुकर यांच्या खंडपीठाने ग्राहकाला मानसिक त्रासापोटी २ हजार रुपये व तक्रार खर्चासाठी १ हजार रुपये देण्याचेही आदेश दिले आहेत. तसेच ४५ दिवसांत आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अतिरिक्त २ टक्के व्याज देण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत.

## जलकुंभांच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करा - विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहराला १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याच्या दृष्टीने शहरातील विद्यमान तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या जलकुंभांमधून पाणी सोडण्यासाठी आवश्यक असलेल्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात शहराच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनिषा पलांडे, जीव्हीपीआर कंपनीचे प्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उच्च न्यायालयाने छत्रपती संभाजीनगर शहराला नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १२ जूनपर्यंत वाढीव पाणीपुरवठा सुरू करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जीव्हीपीआर कंपनीला दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर या बैठकीत विविध कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, न्यायालयाच्या निर्देशानुसार पाणीपुरवठा वेळेत सुरू करण्यासाठी विविध तांत्रिक कामे, पंपांची चाचणी तसेच जलकुंभांशी संबंधित किरकोळ कामे वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त मनुष्यबळ घेऊन कामांना गती द्यावी. शहरातील सर्व जलकुंभांची अपूर्ण कामे पूर्ण करून सर्व ठिकाणच्या पाईपलाईन गॅपची जोडणी तातडीने करावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

या सर्व कामांवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दररोज देखरेख ठेवावी, तसेच महानगरपालिकेने शहरातील प्रत्येक घरापर्यंत नळजोडणी पोहोचविण्यासाठी स्थानिक नगरसेवकांसोबत समन्वय बैठक घेऊन नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

# नवीन ध्रुवीकरणाचे संकेत

केरळ आणि पश्चिम बंगालमधील संभाव्य सत्तापालट केवळ राज्यांपुरता मर्यादित नसून भारतीय राजकारणात राष्ट्रवाद आणि थेट विकासाच्या मुद्द्यांसह नवीन ध्रुवीकरणाचे संकेत देतो. भाजपला पोषक ठरणाऱ्या वातावरणाची निर्मिती देशभर होणे, आगामी उत्तर प्रदेश विधानसभा आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी रणनीती ठरवणारी नवी बाब ठरेल. त्यामुळे राष्ट्रीय राजकारणाची समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात.

भारतीय लोकशाहीच्या पटलावर केरळ आणि पश्चिम बंगाल ही दोन राज्ये नेहमीच वैचारिक लढाईची केंद्रे राहिली आहेत. डाव्यांचा बालेकिल्ला आणि तृणमूलची पकड असलेल्या या राज्यांमध्ये सत्तेचे वारे बदलतात, तेव्हा त्याची कंपने दिल्लीपर्यंत जाणवतात. सत्ता परिवर्तन हे केवळ सत्ताधाऱ्यांचे अपयश नसते, तर मतदारांच्या बदललेल्या आकांक्षांचा हुंकार असतो. पश्चिम बंगालमधील राजकीय हिंसाचार आणि केरळमधील बदलती लोकसंख्याशास्त्रीय समीकरणे यांच्या पार्श्वभूमीवर होणारे सत्तांतर हे भारतीय राजकारणाच्या पूर्वेकडून दक्षिणेकडे जाणाऱ्या नव्या प्रवाहाचे प्रतीक आहे. हे निकाल केवळ राज्यांचे भवितव्य ठरवणार नाहीत, तर देशाच्या संघराज्य रचनेवरही दूरगामी परिणाम करतील. सत्तांतराच्या या प्रक्रियेत स्थानिक प्रश्नांपेक्षा राष्ट्रीय अस्मिता आणि विकासाचे मुद्दे अधिक प्रभावी ठरताना दिसत आहेत. बंगालमध्ये मा-माती-मानुषच्या जागी नवी राजकीय मांडणी उभी राहत आहे, तर केरळमध्ये दर पाच वर्षांनी सत्ता बदलण्याची परंपरा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. या बदलांकडे केवळ एका पक्षाचा विजय किंवा पराभव म्हणून न पाहता, मतदारांच्या बदललेल्या मानसिकतेचा आरसा म्हणून पाहणे गरजेचे आहे. विशेषतः हिंदी पट्ट्यातील उत्तर प्रदेशमधील तसेच भविष्यातील २०२९ ची महालढाई लक्षात घेता, या दोन राज्यांमधील राजकीय उलथापालथ ही मोठ्या वादळापूर्वीची शांतता किंवा परिवर्तनाची पहिली लाट ठरू शकते.

दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने प्रशासकीय यंत्रणा संथ आणि संवेदनशून्य बनते. धोरणात्मक निर्णयांचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या वाढत्या तक्रारींमुळे जनतेमध्ये प्रस्थापित सरकारबद्दल टोकाचा असंतोष निर्माण होतो. बदलाची ही तीव्र इच्छा मतपेटीतून व्यक्त होते, तेव्हा त्याला प्रचंड सत्ताविरोधी लाट म्हणतात. ती प्रबळ सत्ताधाऱ्यांनाही पायउतार करण्यास कारणीभूत ठरते. भ्रष्टाचाराच्या प्रकरणामुळे सरकारची नैतिक प्रतिमा मलीन होते. बंगालमधील शिक्षक भरती घोटाळा आणि केरळमधील सुवर्ण तस्करी प्रकरणाने थेट सुशिक्षित तरुण आणि मध्यमवर्गीयांच्या विश्वासाला तडा दिला. पारदर्शकतेचा अभाव आणि सत्तेचा गैरवापर मतदारांना चिथावणी देणारा ठरतो. त्यामुळे नैतिक अधिष्ठान गमावलेले शासन बदलण्याकडे जनतेचा कल वाढतो, जे सत्तांतराचे प्रमुख निमित्त ठरते. आजचा तरुण मतदार पारंपरिक वैचारिक वादविवादांपेक्षा आर्थिक प्रगती आणि रोजगाराला प्राधान्य देतो. जुन्या राजकीय अस्मितांमध्ये अडकून न पडता तो जागतिक दर्जाच्या संधी आणि आधुनिक पायाभूत सुविधांकडे ओढ दाखवतो. प्रस्थापित सरकारे अशा आकांक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात, तेव्हा हा वर्ग प्रबळ व्होट बँक म्हणून सत्तांतरासाठी निर्णायक भूमिका बजावतो. निवडणुकोत्तर) हिंसाचार आणि राजकीय सूडबुद्धीमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीती व असुरक्षिततेची भावना निर्माण होते. राज्ययंत्रणा कायदा-सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरते, तेव्हा जनतेतील सुप्त नाराजी मतदानातून बाहेर पडते. लोकशाहीत हिंसेला स्थान नसल्याचा संदेश देण्यासाठी मतदार शांतता आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत सत्ता परिवर्तनाचा मार्ग निवडतात.

केंद्र सरकारच्या थेट लाभ हस्तांतरण (डिबिटी) योजनेमुळे मध्यस्थांची साखळी मोडीत निघाली आणि मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली. उज्ज्वला, पीएम-किसान आणि आवास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे गरीब आणि ग्रामीण वर्गात केंद्र सरकारबद्दल विश्वासार्हता वाढली. हा कल्याणकारी राजकीय पॅटर्न प्रादेशिक अस्मितेपेक्षा अधिक प्रभावी ठरून मतदारांना सत्तांतरासाठी प्रेरित करतो. प्रादेशिक पक्षांचे वर्चस्व कमी झाल्याने राष्ट्रीय आघाड्यांच्या नेतृत्वावरून मतभेद वाढून विरोधी ऐक्याला तडा जातो. यामुळे पूर्व आणि दक्षिण भारतात विस्तारणाऱ्या भाजपची पॅन इंडिया प्रतिमा अधिक मजबूत होत आहे. दुसरीकडे, बालेकिल्ले ढासळल्याने डाव्या विचारसरणीचे आकुंचन होऊन राजकीय पटलावर वैचारिक पोकळी निर्माण होत आहे. केंद्र आणि राज्यात एकाच विचाराची सत्ता आल्यास संघराज्य रचनेत समन्वयाचे नवे स्वरूप दिसेल, जिथे अस्मितेच्या राजकारणापेक्षा डबल इंजिन सरकारच्या विकासवादाला जनता अधिक पसंती देत असल्याचे स्पष्ट होते. पश्चिम बंगालमध्ये संघाने (आरएसएस) गेल्या अनेक वर्षांपासून सुरू ठेवलेल्या शाखा विस्तार आणि सामाजिक सेवाकार्याचा मोठा फायदा सत्ता परिवर्तनाच्या प्रक्रियेत झाला.

ग्रामीण भागातील तळागाळातील संवाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाची पेरणी यामुळे मतदारांचे वैचारिक ध्रुवीकरण होण्यास मदत झाली. प्रचारात प्रत्यक्ष सहभाग न घेताही, संघाच्या यंत्रणेने मतदानाची टक्केवारी वाढवण्यात आणि संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यात पडद्यामागून निर्णायक भूमिका बजावली.

# सोमनाथ पर्व: भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक

**भारतीय** संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.

१७८३ मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून, हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे.

आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. 'सोम' म्हणजे चंद्र आणि 'नाथ' म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे. अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

**– माधुरी मिसाळ,**
राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग

# कचरा डेपो हटवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे तीव्र आंदोलन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका करुणा मेघानंद जाधव यांच्या नेतृत्वाखाली भीम नगर, भाऊसिंगपुरा पडेगाव रोडवरील ग्लोरिया सिटी शेजारी असलेल्या कचरा डेपो (डंपिंग ग्राउंड) येथे तीव्र आंदोलन करण्यात आले.

गेल्या चार ते पाच दिवसांपासून डंपिंग ग्राउंडला लागलेल्या आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर विषारी धूर पसरत असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या धुरामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच रुग्णांना श्वसनाचा त्रास, दम्याचे झटके, डोळ्यांची जळजळ आणि विविध आरोग्य समस्या निर्माण होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. कचरा डेपो हटवा, नागरिकांचे आरोग्य वाचवा अशी जोरदार मागणी आता परिसरातून होत आहे. यावेळी नगरसेविका करुणा मेघानंद जाधव, शहराध्यक्ष ॲड. पंकज बनसोडे, शहर उपाध्यक्ष मेघानंद जाधव, भावी गवई, प्रविण जाधव स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# जमीन मोजणीची प्रकरणे निकाली काढण्यासाठी परवानाधारक ३० भूमापकांची नियुक्ती करण्यास मान्यता

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भूमि अभिलेख विभागामार्फत करावयाच्या जमीन मोजणीसाठी आता अभिकरणामार्फत ३० परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यास मान्यता मिळाली असून यासंदर्भातील निविदा सुचना https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली आहे,असे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख डॉ.विजय वीर यांनी कळिवले आहे. मर्यादीत मनुष्यबळामुळे मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून अभिकरणामार्फत ३० परवानाधारक भूमापकांची निवड करण्यात येणार आहे, असेही डॉ. वीर यांनी कळिवले आहे.

दोन वर्षाच्या कालावधीसाठी ही नियुक्ती असेल असेही यानिविदेत स्पष्ट करण्यात आले आहे. या निविदा ई-निविदा पद्धतीने दि.१९ मे पर्यंत मागविण्यात आल्या आहेत. दि.२१ रोजी या निविदा उघडण्यात येणार आहेत. निविदेच्या इतर अटी व शर्ती संकेतस्थळावर पाहता येतील.

# पालकांनी आपल्या मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज -प्रा. विठ्ठल कांगणे

## छत्रपती संभाजीनगर विमानतळ येथे १५ वा संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय विमानपत्तन प्राधिकरण अंतर्गत एस.सी./एस.टी. एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर विमानतळ यांच्या वतीने आयोजित १५ वा संयुक्त जयंती महोत्सव शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी विमानतळ कॉलनीतील सामुदायिक भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाला सतीश गायकवाड, रामेश्वर कोरडे अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती. संयुक्त जयंतीचे अध्यक्ष कार्यकारी डायरेक्टर विजय कोरडे, सचिव नितीनजी मेश्राम, कोषाध्यक्ष योगेश शिरसागर, एससी एसटी असोशियन अध्यक्ष श्रीमंत रामभाऊ साळवे, सेक्रेटरी श्री रवींद्र कैलास टेंभुर्णे, एससी एसटी असोशियन सेंट्रल एक्झिक्युटिव्ह मेंबर रेखाताई दीपक पवार यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात कुणाल वराळे निर्मित 'युगपुरुष ऑर्केस्ट्रा'च्या शानदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. विठ्ठल कांगणे सर यांनी आपल्या प्रबोधनपर व्याख्यानातून सामाजिक एकता, शिक्षण आणि युवकांच्या जबाबदाऱ्यांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

समाजामध्ये वाढत चाललेली गुंडागिरी, दहशत आणि चुकीच्या प्रवृत्तींचे अंधानुकरण यावर कठोर शब्दांत भाष्य करत पालकांनी आपल्या मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



शिवाजी महाराजांचे अनुशासन आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण हेच खरे आदर्श आहेत. पैशाच्या जोरावर दहशत निर्माण करणाऱ्यांचे अंधानुकरण मुलांनी करू नये, असा संदेश प्रा. विठ्ठल कांगणे सर यांनी यावेळी दिला.

समाजातील काही व्यक्ती पैशाच्या बळावर स्वतःची प्रतिमा गुंड, गुन्हेगारी, दादागिरी निर्माण करत असून, तरुण पिढी त्यांचे अनुकरण करत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. आई-वडिलांनी आपल्या लेकरांकडे, विशेषतः मुलींकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. संस्कार आणि शिक्षण यांनाच महत्त्व दिले पाहिजे, असेही सांगण्यात आले.

यावेळी मुलींना उद्देशून भावनिक संदेश प्रा. विठ्ठल कांगणे सर यांनी म्हणाले की, तू ऑफिसला जा, मेहनत कर, स्वतःच्या पहिल्या पगारातून कॉफी घे आणि त्या क्षणाचा अभिमानाने सेल्फी काढ. पण त्या आनंदामागे आपल्या आई-वडिलांचे कष्ट आणि पाठबळ विसरू नकोस. आपल्या यशामध्ये आई-वडिलांचा सन्मान असला पाहिजे. या संदेशातून तरुणांना योग्य मार्ग निवडण्याचे, पालकांचा आदर राखण्याचे आणि समाजात सकारात्मक विचार रुजवण्याचे आवाहन प्रा. विठ्ठल कांगणे सर यांनी केले.

कार्यक्रमास भारतीय विमानपत्तन प्राधिकरणचे अधिकारी, कर्मचारी तसेच विमानतळ परिसरातील , नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर रात्री ९ वाजता सुरुची भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमात बोलत असताना कांगणे सर म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिल्या घटनेनुसार महिलांना अनेक अधिकारांची प्राप्ती झाली आहे. आणि त्यामुळेच इतक्या पुरुषांमध्ये एक बाई सुंदर मेकअप करून बसली आहे. म्हणूनच तर महिलांना जी जबाबदारी दिली. तर त्यांनी ती पूर्ण केली पाहिजे असे सांगितले. हा कार्यक्रम नियोजनबद्ध व यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी रेखा पवार व अधिकारी कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले या कार्यक्रमाला चार चांद लावले शेवटी रेखा पवार यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले. यावेळी ते भाऊक झाले होते.

# इंधन बचतीसाठी महावितरणचे... आता एक पाऊल पुढे!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचतीसाठी पेट्रोल व डिझेलऐवजी विद्युत वाहनांचा वापर करण्याचे आवाहन पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यास महावितरणने कृतीशील प्रतिसाद दिला असून अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांच्यासह सर्व संचालक आणि कार्यकारी संचालकांनी विद्युत वाहनांचा वापर सुरू केला आहे.

दरम्यान सर्व संचालकांसाठी गुरुवारी (१४ मे) नवीन विद्युत वाहने उपलब्ध झाले असून या ईव्ही वाहनांचा वापरही सुरू करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या विद्युत वाहन धोरण २०२५ ला अनुसरून महावितरणने पेट्रोल व डिझेल वाहनांऐवजी विद्युत वाहनांना प्राधान्य दिले आहे. पहिल्या टप्प्यात म हावितरणच्या मुख्य व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विद्युत वाहनांच्या खरेदीची प्रक्रिया राबविण्यात आली. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी विद्युत वाहनांचा याआधीच वापर सुरू केला आहे. गेल्या आठवड्याभरात आणखी १० विद्युत वाहने महावितरणच्या ताफ्यात दाखल झाले. या विद्युत वाहनांचा प्रादेशिक विभागांचे सहव्यवस्थापकीय संचालक आणि सर्व कार्यकारी संचालकांनी नुकताच वापर सुरू केला आहे. दरम्यान मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद देत उर्वरित विद्युत वाहनांच्या उपलब्धतेसाठी महावितरणकडून विशेष पाठपुरावा करण्यात आला. ही वाहने गुरुवारी (१४ मे) उपलब्ध झाली. त्यानंतर संचालक श्री.सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री.अनुदीप दिघे (वित्त), श्री.योगेश गडकरी (वाणिज्य), श्री.राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांनीही तात्काळ या विद्युत वाहनांचा वापर सुरू केला आहे. महावितरणअंतर्गत सर्व मुख्य अभियंता तसेच क्षेत्रीय अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांच्या कार्यालयातही पेट्रोल किंवा डिझेलऐवजी फक्त विद्युत वाहनांचा वापर होईल याबाबतच्या प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे.

# वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह गुणवंत सन्मान पुरस्कारासाठी नोंदणीस प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

परदेशी, राजपूत समाजातील गुणवंतांनी महाराणा प्रतापसिंह गुणवंत पुरस्कार साठी नांव नोंदणी करावी असे आवाहन शिवराणा सेवा संघ यांच्या वतीने करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवराणा सेवा संघ वतीने वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह गुणवंत सन्मान पुरस्कारासाठी नोंदणी करावी अहवान शिवराणा सेवा संघ वतीने करण्यात आले आहे. भव्य दिव्य गुणवंत विद्यार्थी बरोबर शासकीय सेवेत नव्याने निवड करण्यात आली.

युपीएससी व एमपीएससी राज्यसेवेतून निवड करण्यात आली आहे. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच जिल्हा व राज्य पातळीवर खेळाडू चा सन्मानित करण्यात येणार आहे व विविध क्षेत्रातील मान्यवर कार्य करणाऱ्या मान्य वरांना समाज भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. दहावी व बारावीच्या परीक्षेत ७० टक्के पैक्षा अधीक गुण मिळाले आहे. त्यांनी नोंदणी करावी परदेशी राजपूत समाजातील गुणवंतानी मार्गदर्शन केले जाते गुणवंत पुरस्कार सोहळ्यात व्यक्ते मार्गदर्शन करतात नांव नोंदणी करावी शिवराणा सेवा संघ नांव नोंदणी खालील कमेटीकडे करण्याचे आवाहन शिवराणा सेवा संघातर्फे करण्यात आले. एल.डी. ताटू अध्यक्ष ८३०८१३६६८९, भोरासिंग राजपूत, आनंद बारवाल, अंजली कोकुल्डे, फुलसिंग राजपूत आदी.

# विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम; जिल्ह्यातील मतदारांची होणार पडताळणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचाही समावेश करण्यात आला असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ४४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. ही मोहीम जून ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे.

निवडणूक आयोगाकडून नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (SIR) प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन त्यांच्या तपशिलाची खातरजमा करणार आहेत. या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमलेले बूथ लेव्हल एजंट्स (इडअ) या अधिकाऱ्यांना सहकार्य करणार आहेत.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा (Field Staff) विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले, जेणेकरून दोन्ही कामांमध्ये सुसूत्रता राखता येईल. महाराष्ट्रासाठीचे महत्त्वाचे वेळापत्रकमध्ये बीएलओ प्रशिक्षण हे २० ते २९ जून दरम्यान देण्यात येणार आहे. ३० जून ते २९ जुलै २०२६या कालावधीत घरोघरी जाऊन प्रत्यक्ष भेटी देण्यात येणार आहेत.मसुदा मतदार यादी प्रसिद्धी ही ५ ऑगस्ट २०२६ रोजी होईल.यावर दावे व हरकती नोंदवणे साठी ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ दरम्यान दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी प्रसिद्धी दिनांक ७ ऑक्टोबर २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (BLA) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. राजकीय पक्षांच्या सहभागामुळे मतदार यादीतील दुबार नावे वगळणे, मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक अचूक, पारदर्शक आणि दोषरहित होण्यास मदत होणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात देखील विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम (SIR)ही प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

# पेपरफुटीनंतर मोठा निर्णय; NEET परीक्षा आता २१ जून २०२६ होणार!

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

देशभरातील लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून नीट परीक्षा २०२६ ची नवी तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. पेपरफुटीच्या गंभीर आरोपांमुळे ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, भीती आणि प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, आता अखेर आयोगाकडून नवीन तारीख जाहीर करण्यात आली आहे. देशभरात २ मे २०२६ रोजी नीट परीक्षा पार पडली होती. मात्र परीक्षा संपल्यानंतर काही तासांतच पेपरफुटीचे गंभीर आरोप समोर आले. या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली. सुरुवातीला काही राज्यांमधून संशय व्यक्त करण्यात आला, मात्र नंतर राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर आणि लातूरपर्यंत या रॅकेटचे धागेदोरे पोहोचल्याचे समोर आले. काही आरोपींना अटकही करण्यात आली आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक खुलासे होत असून काही विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका पोहोचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

हे संपूर्ण प्रकरण अत्यंत गंभीर मानत केंद्र सरकारने तात्काळ हालचाली सुरू केल्या. प्रकरणाचा तपास थेट सीबीआयकडे सोपवण्यात आला. सीबीआयने प्राथमिक चौकशीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे संकेत दिल्यानंतर परीक्षा प्रक्रिया थांबवण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, आता नीट परीक्षा २०२६ची नवी तारीख जाहीर करण्यात आली असून २१ जून २०२६ रोजी देशभरात पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. आयोगाने अधिकृत घोषणा करत विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तयारीसाठी वेळ दिला आहे. मात्र, परीक्षा पुन्हा द्यावी लागणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे वातावरण कायम आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून मोठ्या प्रम णावर आंदोलनं आणि नाराजी व्यक्त केली जात होती. या संपूर्ण प्रकरणावर चर्चा करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या दिल्लीतील निवासस्थानी काल रात्री उशिरापर्यंत उच्चस्तरीय बैठक पार पडली. ही बैठक तब्बल दोन तास चालली. बैठकीत नीट आणि नेट परीक्षेतील पेपरफुटी, सुरक्षा व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला उच्च शिक्षण सचिव सचिन विनीत जोशी, शालेय शिक्षण सचिव संजय कुमार, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, राहुल सिंग आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने यापूर्वीच सीबीआयला पूर्ण सहकार्य करण्याचे स्पष्ट केले आहे. तपासादरम्यान नाशिकहून राजस्थानपर्यंत आणि राजस्थानहून हरियाणापर्यंत पेपर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. काही मोठी नावेही या प्रकरणात समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सीबीआयकडून कसून चौकशी सुरू आहे. आता २१ जून रोजी होणारी नीट परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी केंद्र सरकार आणि आयोगाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य या परीक्षेशी जोडलेले असल्याने प्रशासनावर मोठी जबाबदारी आहे.

# शनि अमावस्येनिमित्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सव उत्साहात संपन्न

## आचार्य सिद्धांतसागरजी महाराज व आचार्य गुनभद्रनंदीजी महाराज ससंघ यांच्या सान्निध्यात भक्तिमय वातावरणात हजारो भाविकांनी घेतले भगवान मुनिसुव्रतनाथांचे दर्शन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री शनिग्रह अरिष्ट निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र, पैठण येथे शनिअमावास्येनिमित्त आयोजित भव्य महामस्तक अभिषेक महोत्सव अत्यंत भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात संपन्न झाला. भारतातील जैन धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या मूलनायक भगवान मुनिसुव्रतनाथ यांच्या महामस्तक अभिषेकासाठी राज्यासह देशभरातून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली होती.



संपूर्ण कार्यक्रम बुंदेलखंड केसरी आचार्य श्री १०८ सिद्धांतसागरजी महाराज व प्रशांतमूर्ती आचार्य श्री १०८ गुनभद्रनंदीजी महाराज ससंघ यांच्या पावन सान्निध्यात तसेच अंतर्मना आचार्य श्री १०८ प्रसन्नसागरजी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने पार पडला. सकाळी भगवान मुनिसुव्रतनाथ विधान, धर्मध्वजारोहण व महामस्तक अभिषेक विधी मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला. जयघोष, मंत्रोच्चार आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण तीर्थक्षेत्र मंगलमय झाले होते.

यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान प्रतिभा दिपक स्वयंम प्रियंका सौरभ रति जित ओमांश विवान अजमेरा परिवार यांना मिळाला. तर शांतीधारेचा मान देवेंद्र दिपेश जैन दिल्ली यांना मिळाला तर जल अभिषेकाचे सौभाग्य रफ्पीन आयुष जैन उत्तराखंड यांना मिळाला. तसेच जयेश काला सी.ए.मुंबई यांना अभिषेकाचा मान मिळाला तर नारळ रसाचे सौभाग्य संदिप शितल धनशेटटी इंटी कर्नाटक यांना मिळाला तर इक्शुरसाचे सौभाग्य सचिन किशन जैन मुंबई यांना मिळाला. तर आर्म्ररस निलम किर्ती अजमेरा परिवार यांना मिळाला.

मोसंबी रस श्रेयांस विजयकुमार जैन मुंबई यांना मिळाला. ध्रुत अभिषेक देवांश भौतिक अभिषेक सागर शाह यांना मिळाला. दुग्ध अभिषेक रजत महेंद्र ठोले यांना मिळाला. दहि अभिषेक सुमित किशोर गंगवाल यांना मिळाला. सर्व औषधी विजय वर्धमान सावळे पुणे यांना मिळाला. प्रथम कळस निधी शाह सोलापुर यांना मिळाला. दुसरा कळस सुनिल पन्नालाल गोधा, तिसरा कळस धरमचंद जैन  चतुर्थ कळस नरेश डोसी सुरत यांना मिळाला. चंदनलेपन राजेश पाटणी हैद्राबाद यांना मिळाला, पुष्पवृष्टी मनोज चौधरी हैद्राबाद यांना मिळाला तर मंगल आरती राकेश जैन हैद्राबाद यांना मिळाला तर पुर्ण कळस देवेंद्र दिपेश जैन चंद्रशेखर कासलीवाल यांना मिळाला. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन श्रेत्राचे महामंत्री विलास पहाडे यांनी केले.

यानंतर आयोजित धर्मसभेत आचार्य श्री १०८ सिद्धांतसागरजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, 'मनुष्य जीवन हे धर्म, संयम आणि साधनेसाठी मिळालेले अमूल्य वरदान आहे. आजचा माणूस बाह्य सुखाच्या मागे धावत असताना आत्मशांतीपासून दूर जात आहे. भगवान मुनिसुव्रतनाथांच्या जीवनातून संयम, क्षमा आणि त्याग यांचा आदर्श घ्यावा. ग्रहदोषापेक्षा कर्मदोष मोठा असतो आणि चांगल्या कर्मांनीच जीवन मंगलमय होते.'

प्रशांतमूर्ती आचार्य श्री १०८ गुनभद्रनंदीजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, 'महामस्तक अभिषेक म्हणजे केवळ भगवानांवर जलाभिषेक नव्हे, तर आपल्या अंत:करणातील राग-द्वेष धुऊन टाकण्याची साधना आहे. धर्म, अहिंसा आणि सदाचार यांच्या मार्गावर चालल्यास जीवनात खरे सुख प्राप्त होते.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्र स्नेहदेवी सूरजमल दिल्ली, अमित बडजाते, निलम अजमेरा, रतनलाल पहाडिया, विनय सुरथेधाने, अशोक जैन व मनोज चौधरी उपस्थित होते.

महोत्सवानिमित्त हजारो भाविकांसाठी प्रतिभा, स्वयं, प्रियंका, सौरभ, इति, जीत, ओमाश, विवान सिद्धीत अजमेरा परिवार, धाराशिव यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रभावी मंच संचालन बोलीसम्राट प्रविण लोहाडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, कोषाध्यक्ष विजय पापडीवाल, विश्वस्त जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमीत गंगवाल, डॉ. संजय गंगवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे, अभिजीत काला यांच्यासह विश्वस्त मंडळाने परिश्रम घेतले.अशी माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

या महोत्सवासाठी छत्रपती संभाजीनगर, हैदराबाद, मुंबई, पुणे, नाशिक, जयपूर, राजस्थान, दिल्ली आदी ठिकाणांहून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशी माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

# अनियमित बांधकाम हटविण्यात येणार; गुंठेवारी नियमित असलेल्या बांधकामांनाच बँकांनी गृहकर्जे मंजूर करावे -विभागीय आयुक्त जी. श्रीकांत



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील विनापरवाना असलेली  मालमत्ता गुंठेवारी नियमित करण्याची प्रक्रिया सुरू असून शासन नियमांनुसार ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची विनापरवाना बांधकामे नियमित करण्यात येणार आहेत. त्यानंतरची बांधकामे अनधिकृत मानली जाणार असून अशी बांधकामे हटविण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्व बँक व्यवस्थापकांनी गुंठेवारी नियमित असल्याचे अधिकृत प्रमाणपत्र आणि बांधकाम परवाने तपासल्याशिवाय गृहकर्ज मंजूर करू नये, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामांना कर्जपुरवठा तसेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, सहआयुक्त अंजली धानोरकर, प्रभारी उपायुक्त सुनंदा पारवे, उपमुख्यलेखा व वित्त अधिकारी साधना बांगर, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा समन्वयक, विविध बँकांचे व्यवस्थापक तसेच महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, शहराबाहेरील भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत इमारती उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे लोकसंख्या वाढून पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन आणि ड्रेनेज व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण होत आहे. शासनाने ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची गुंठेवारी बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला असून सुधारणा शुल्क (बेटरमेंट चार्जेस) भरून ही प्रक्रिया सुरू आहे.

काही ठिकाणी चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे बँकांकडून गृहकर्ज घेण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा अनधिकृत बांधकामांवर कारवाई झाल्यास बँकांसमोर कर्जवसुलीची समस्या निर्माण होते. त्यामुळे सर्व बँकांनी गुंठेवारी नियमित असल्याचे अधिकृत प्रमाणपत्र तपासूनच गृहकर्ज मंजूर करावे. तसेच अधिकृत बांधकाम प्रस्तावांना गुंठेवारी नियमित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

वाढत्या लोकसंख्येमुळे विशेषत: वाळूज औद्योगिक परिसरात घनकचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

औद्योगिक क्षेत्रासोबतच लगतच्या भागात मोठ्या प्रमाणात निवासी वसाहती निर्माण होत आहेत. त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे संकलन व व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. त्यासाठी औद्योगिक क्षेत्रात कचरा प्रक्रिया व व्यवस्थापनासाठी किमान दहा एकर जागा आरक्षित ठेवावी. तसेच सिडकोच्या ज्या जागांची विक्री झालेली नाही, त्या ठिकाणीही किमान दहा एकर जागा कचरा व्यवस्थापनासाठी राखीव ठेवण्याची सूचना विभागीय आयुक्तांनी केली.

# बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया बंजारा टायगर्सचे आमरण उपोषण सुरू

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया बंजारा टायगर्सच्या वतीने सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.४० वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येत आहे. या उपोषणाचे नेतृत्व संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अशोक आर. राठोड हे करत आहेत. त्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) राज्यातील बंजारा समाजाला त्वरीत अनुसुचित जमाती (एस.टी.) समावेश करण्यात यावे किंवा एस.सी., एस.टी., समकक्ष तिसऱ्या सुचीची तात्काळ अंमलबजावणी करण्यात अनुसुचित जमाती प्रमाणेच सर्व सवलती देण्यात याव्यात. यावी. नसता राज्यातील धनगर समाजाप्रमाणे समाजाप्रमाणे बंजारा समाजाला अनुसुचित जमातीप्रमाणे सर्व सवलती द्यावेत.

२) संत सेवालाल महाराज बंजारा/लभाणा तांडा समृध्दी योजने अंतर्गत राज्यातील जास्तीत जास्त तांड्यात विकासात्मक कामे मंजुर करण्यासाठी ग्रामविकास व पंचायतराज विभागाला राज्य शासनातर्फे १००० कोटी रुपये त्वरीत उपलब्ध करुन दयावेत.

३) वसंतराव नाईक महामंडळाची भाग भांडवल मर्यादा १५०० कोटी रुपये करण्यात यावे.

४) वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला केंद्र शासनाकडून एनबीसीएफडीसी योजने अंतर्गत कर्ज घेण्यासाठीची राज्य शासनाने काढून घेतलेली हमी पूर्ववत घेऊन थेट योजने अंतर्ग १ ते १० लाखापर्यंतची योजना पूर्ववत चालु करावी किंवा राज्य शासनातर्फे विना भेदभाव १ ते १० लाखापर्यंतची थेट कर्ज योजना सुरु करण्यात यावी.

५) उद्योगपती व शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या कर्ज माफीच्या धर्तीवर वसंतराव नाईक महामंडळामार्फत यापुर्वी वाटप झालेले परंतु वसुल न झालेले ०१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २०२५ पर्यंतचे सर्व थकीत कर्ज माफ करण्यात यावे.

६) वसंतराव नाईक महामंडळामार्फत राज्य शासनातर्फे थेट योजने अंतर्गत १ लाखाच्या योजने ऐवजी कमीत कमी २ ते ५ लाखापर्यंतची कर्ज योजना विनाविलंब सुरु करण्यात यावी.

७) व्ही.जे.एन.टी. समाजाचे नसतांनाही व्ही. जे.एन.टी. प्रमाणपत्र मिळवून बोगसगिरी करणाऱ्या विरुध्द एसआयटी मार्फत चौकशी करुन दोषीविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात यावी.

८) विमुक्त जाती व भटक्या जमातीसह तमाम ओबीसींची जातनिहाय जनगणना करुन लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात यावे.

९) ऑल इंडीया बंजारा टायगर्स, बंजारा क्रांती दल तर्फे संत सेवालाल महाराज बंजारा / लभाणा तांडा समृध्दी योजने अंतर्गत कामे मंजुर करुन घेण्यासाठी ग्रामविकास व पंचायतराज विभागाकडे सादर केलेले प्रस्ताव त्वरीत मंजुर करुन प्रशासकीय मान्यता वितरीत करण्यात याव्यात.

१०) केंद्रीय व राज्य आरक्षण आयोग, लोकसेवा आयोग, महिला आयोग, कुलगुरु नियोजन मंडळ, निती आयोग, महामंडळ आदी संविधानिक पदावर बंजारा समाजाला प्रतिनिधीत्व देण्यात यावेत.

या बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया बंजारा टायगर्सच्या वतीने सोमवार, दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी १०.४० वाजल्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येत आहे. या उपोषणाचे नेतृत्व संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. अशोक आर. राठोड हे करत आहेत.

हे साप्ताहिक  मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद  ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199